विमुक्त जाती व भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग कल्याण विभागांतर्गत महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळ (मर्यादित) मुंबई या महामंडळावर अध्यक्ष व उपाध्यक्ष यांच्या नेमणूकीबाबत.......

-----------------------------------------

**महाराष्ट्र शासन**
शासन निर्णय क्र. संकीर्ण २०१७/प्र.क्र.७/महामंडळे,
विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग कल्याण विभाग,
हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक :- ११ जुलै, २०१७.

**वाचा** :-१) शासन निर्णय, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, क्र. संकीर्ण २०१२/प्र. क्र.१०९/ महामंडळे, दि. १८ जुलै, २०१२.

२) शासन निर्णय, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, क्र.इमाव २०१४/प्र.क्र – २४/ महामंडळे, दि.१९ जानेवारी, २०१४.

३) शासन निर्णय, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, क्र.इमाव २०१४/प्रक्र ३८७ महामंडळे, दि.१२ डिसेंबर, २०१४.

४) शासन निर्णय, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, क्र.संकीर्ण २०१५/ प्र.क्र. ९२/ महामंडळे, दि.८ ऑगस्ट, २०१६.

**प्रस्तावना:-**

महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळ (मर्यादित) मुंबई या महामंडळावर संबंधित महामंडळाच्या संस्थापन समय लेख व संस्थापन नियमावली, नियमावलीत ३ नियम क्रमांक ८२ (१) व (२) व ८० (१) व (२) प्रमाणे शासन निर्णय, दि.८ ऑगस्ट, २०१६ अन्वये या महामंडळाच्या अध्यक्ष पदाचा अतिरिक्त कार्यभार, पुढील आदेश होईपर्यंत मा.राज्यमंत्री, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य यांच्याकडे सोपविण्यात आला होता. संस्थापन समय लेख व संस्थापन नियमावली, नियमावलीतील नियम क्रमांक ८२(३) नुसार ८२(४) आणि नियम क्रमांक ८०(३) नुसार शासन निर्णय दि.८ ऑगस्ट, २०१६ अन्वये सोपविण्यात आलेला अतिरिक्त कार्यभार रद्द करण्यात येत आहे.

त्यानुसार महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळ (मर्यादित) मुंबई या महामंडळावर अध्यक्ष पदावर मा.मंत्री, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग कल्याण यांची आणि उपाध्यक्ष पदी मा.राज्यमंत्री, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग कल्याण यांची नियुक्ती करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय**:-

शासन याद्वारे महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळ (मर्यादित) मुंबई या महामंडळाचे संस्थापन अध्यक्ष म्हणून मा.मंत्री, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग कल्याण यांची आणि उपाध्यक्ष म्हणून मा.राज्यमंत्री, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग कल्याण यांची नियुक्ती पुढील आदेश होईपर्यंत करण्यात येत आहे.

हे आदेश तात्काळ अंमलात येतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

-स्वाक्षरित /-

(दिनेश वाघमारे)
सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रत :-

मा.राज्यपाल यांचे सचिव.
मा.मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्यसचिव, मंत्रालय, मुंबई.
मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई.
मा.मंत्री ,विमुक्त जाती व भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग कल्याण, मंत्रालय, मुंबई.
मा.राज्यमंत्री, विमुक्त जाती व भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग कल्याण, मंत्रालय, मुंबई.
सर्व मंत्री, राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव.
सचिव (सामाजिक न्याय व विशेष सहाय्य) मंत्रालय, मुंबई.
सचिव (विजाभज इमाव व विमाप्र कल्याण) मंत्रालय, मुंबई.
व्यवस्थापकीय संचालक, वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ, मुंबई,
सर्व मंत्रालयीन विभाग.
महालेखापाल महाराष्ट्र १/२ (लेखा व अनुज्ञेयता)/ (लेखा परीक्षा), मुंबई/ नागपूर.
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
सर्व विभागीय आयुक्त,
सर्व जिल्हाधिकारी.
महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई.
आयुक्त, अपंग कल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे.
आयुक्त, समाज कल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे.
संचालक, विमुक्त जाती भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग कल्याण, संचालनालय, पुणे.
सचिव, भारत सरकार व गृह मंत्रालय, नवी दिल्ली. (पत्राने)
सर्व सहसचिव/अवर सचिव/ कक्ष अधिकारी, विमुक्त जाती व भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग कल्याण, मंत्रालय, मुंबई.
निवड नस्ती, महामंडळे.